उत्कृष्ट क्वालिटी
साबुदाणा ५५ रु.किलो
शेंगदाणे १०० रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१३७ ■ सोमवार २४ फेब्रुवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४
POST REGD.No./DHL/53/24-26




# मराठीच्या संवर्धनासाठी सर्वांनी कटीबद्ध व्हावे!

## साहित्य संमेलनाच्या समारोपाप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदेंचे आवाहन

**नवी दिल्ली, दि.२३ (प्रतिनिधी) - भाषा ही आपली ओळख, अस्मिता, आणि अभिमान असून भाषा हेच आपले अस्तित्व आहे. भाषा संपली तर आपले अस्तित्वही संपेल हे लक्षात घेऊन तिच्या संवर्धनासाठी सर्वांनी कटीबद्ध व्हावे, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी केले. संमेलनाचा रविवारी उत्साहात समारोप झाला.**

दरम्यान, मराठीला अभिजात वैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही देताना नवी दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू उभारण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केली. राजधानीतील तालकटोरा स्टेडिअममध्ये उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत गेले तीन दिवस सुरू असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप आज सायंकाळी झाला. या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषामंत्री उदय सामंत, संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, लोकमत वृत्तपत्रसमूहाचे अध्यक्ष विजय दर्डा, डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ.पी.डी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासह अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा.उषा तांबे, कार्यवाह डॉ.उज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, निमंत्रक संजय नहार, शैलेश पगारिया, युवराज शहा यांच्यासह साहित्य महामंडळाचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. (पान ४ वर)

## पंतप्रधान मोदींनी महाराष्ट्र धर्म पराभूत केला; सोनावणींचे परखड मत

**नवी दिल्ली, दि.२३- मराठी भाषा संस्कृतपासून जन्माला आली, असे विधान करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी याद्वारे महाराष्ट्र धर्मच पराभूत केला आहे, असे परखड मत ज्येष्ठ साहित्यीक विजय सोनावणी यांनी महाराष्ट्र भाषा व महाराष्ट्र धर्म या परिसंवादात बोलतांना व्यक्त केले. संमेलनातच असे वक्तव्य करणाऱ्या पंतप्रधान मोदींना मराठी जनांनी विरोध का केला नाही, असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.**

महाराष्ट्रात आम्ही राम-राम म्हणणारे लोक जय श्रीरामपर्यंत कसे पोहोचलो, हेच आम्हाला कळले नाही. आम्ही आमचा महाराष्ट्र धर्म विसरलो का, उत्तरेच्या राजकारणाचे बळी पडलो का, असे बोचरे प्रश्न देखील संजय सोनावणी यांनी उपस्थित केले. महाराष्ट्रातील जनतेच्या आशा, आकांक्षा, स्वप्ने, निराशा या सगळ्यांचा सामूहिक उद्गार म्हणजे महाराष्ट्र धर्म. महाराष्ट्राची वैचारिक परंपरा (पान ४ वर)

## काँग्रेस मुख्यालयात आजपासून बैठका

मुंबई, दि.२३- काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदाचा पदभार स्विकारल्यानंतर हर्षवर्धन सपकाळ यांनी संघटना बांधणीला सर्वप्रथम प्राधान्य देत आढावा बैठकांचे आयोजन केले आहे. राज्यातील सर्व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांची बैठक सोमवार दि.२४ फेब्रुवारी रोजी दुपारी १.३० वाजता तर मंगळवार दि.२४ फेब्रुवारी दुपारी १.३० वा. रोजी प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकांमध्ये संघटनात्मक बाबींचा आढावा घेतला जाणार आहे तसेच पुढील कार्यक्रमांच्या नियोजनासंदर्भात प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ जिल्हाध्यक्ष व पदाधिकारीऱ्यांशी चर्चा करणार आहेत. या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे (पान ४ वर)



## टीम इंडियाचा दणदणीत विजय चॅम्पियन ट्रॉफीतून पाकिस्तान आऊट

**दुबई, दि.२३- भारताने आपल्या पारपंरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा सात विकेट्सनी धुव्वा उडवून आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीत सलग दुसरा विजय साजरा केला. या विजयासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीचे तिकीट जवळजवळ निश्चित केले आहे. न्यूझीलंडपाठोपाठ भारताकडूनही झालेल्या पराभवाने यजमान पाकिस्तानचे आव्हान साखळीतच संपुष्टात आले आहे.**

या सामन्यात भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानचा डाव २४१ धावांत गुंडाळून निम्मी लढाई जिंकली (पान ४ वर)

## नागेश्वर येथे महाशिवरात्री श्री पार्थिव शिवपूजन सोहळा

शिरपूर, दि.२३- नागेश्वर येथे श्री क्षेत्र नागेश्वर संस्थानतर्फे महाशिवरात्री निमित्त २६ फेब्रुवारी रोजी श्री पार्थिव शिवपूजन सोहळा आयोजित करण्यात आला असून भविकांनी सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष भूपेशभाई पटेल यांनी केले आहे. शिरपूर-चोपडा मार्गावरील अजनाड गावाजवळील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या नागेश्वर सेवा संस्थानतर्फे येत्या महाशिवरात्रीला श्री नागेश्वर सेवा संस्थानचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून शिवभक्तांसाठी २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी महाशिवरात्रीचे औचित्य साधून श्री क्षेत्र नागेश्वरच्या भूमीत १००८ जोडप्याद्वारे शिवपूजन व मंत्रयुक्त रुद्राक्षांचे (पान ४ वर)

## मालमत्ता कर वसुलीसाठी आयुक्त स्वत: फिल्डवर! रविवारी सुट्टीच्या दिवशीही कर्मचाऱ्यांसोबत मोहीम



**धुळे, दि.२३- मालमत्ता कर थकबाकी वसुलीसाठी स्वत: आयुक्त फिल्डवर उतरल्या असून कर वसुलीसाठी थेट थकबाकीदारांच्या दारासमोर ढोल बडवले जात आहेत. दरम्यान, आज दुपारी आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे पाटील यांनी सुट्टीच्या दिवशी वसुली विभाग व घरपट्टी वसुलीसाठी नियुक्त केलेल्या सर्व पथक प्रमुखांचा आढावा घेऊन थकबाकी वसुली बाबत कडक कार्यवाही करण्याबाबतचे आदेशित केले. यात सर्वांनी फक्त वसुलीसाठी कार्यरत रहावे असे देखील त्यांनी स्पष्ट केले.**

आयुक्त स्वतः आज पारोळा रोड वरील थकीत मालमत्ता धारकांकडे समक्ष भेटी देऊन थकीत मालमत्ता कर भरण्याबाबत सूचित केले त्यानुसार आज अनेक मालमत्ताधारकांनी आपला थकीत कर महानगरपालिकेत धनादेशाद्वारे जमा केलेला आहे. सदर मोहिमेत सातत्य ठेवून कडकपणे कार्यवाही करावी असे आदेश आयुक्त अमिता दगडे पाटील यांनी पथक प्रमुखांना दिलेले असून थकबाकीदार मालमत्ताधारकांनीही आपली थकीत कर भरून महानगरपालिकेस सहकार्य करावे व होणारी कटू कार्यवाही टाळावी (पान ४ वर)

## आयशरच्या धडकेत एक ठार, एक जखमी

नंदुरबार, दि.२३ (प्रतिनिधी)- भरधाव वेगातील आयशर गाडीने दोन दुचाकींना धडक दिल्याने एक जण ठार तर एक जखमी झाल्याची घटना विसरवाडी ते नंदुरबार रस्त्यावरील वडदा गावाजवळ घडली. मयत व जखमी हे दोघे शेतकरी असून शेतातील शेती पिकांना पाणी देवून घरी जातांना त्यांचा अपघात घडला. नवापूर तालुक्यातील वडदा येथील बाबू शामू कोकणी हे शेती पिकांना पाणी देवून दुचाकीने (क्र.एमएच ३९ एएफ ७०८६) घरी जात होते. तसेच वडदा येथीलच दुसरे शेतकरी हे देखील दुचाकीने (क्र. एमएच ३९-८५५२) घरी जात होते. विसरवाडी ते नंदुरबार रस्त्यावरील (पान ४ वर)

## पिंपळनेरमधून खाद्यतेलाच्या टाक्यांसह पिकअप लांबविणाऱ्या भामट्यास पोलिसांनी केली अटक



**धुळे, दि.२३- साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथून खाद्यतेलाच्या टाक्यांसह चोरुन आणलेले पिकअप वाहन तालुका पोलिसांनी अवघ्या तीन तासात शोधून काढत आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.**

याबाबत अधिक माहिती अशी की, दि.२२ रोजी सकाळी ५.३० वाजेच्या सुमारास पिंपळनेर येथून हिरालाल रघुनाथ दशपुते रा.पिंपळनेर ता.साक्री यांचे मालकीचे महिन्द्रा पिकअप वाहन क्रमांक (एमएच १८ एए ५२५१) आणि त्यात ठेवलेल्या सोयाबीन खाद्य तेलाच्या भरलेल्या ८ लोखंडी टाक्या असे एकुण ७ लाख ८ हजार ८०० रुपयांचा माल व वाहन कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याच्या तक्रारीवरुन पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सदर घटनेची माहिती प्राप्त होताच पोनि अभिषेक पाटील यांना मिळालेल्या माहितीच्या आधारावर आणि गुन्हयाचे गांभीर्य लक्षांत घेवून अधिनस्त असलेले पोहवा.हर्षल धनगर, पोना. संदीप शिंदे, पोकॉ.रविंद्र सोनवणे, पोकॉ.धिरज सांगळे, पोकॉ.राहुल देवरे, पोकॉ.प्रतिक देसले यांना गुन्ह्याची माहिती सांगून गुन्हयातील चोरट्याची माहिती काढण्याच्या सुचना केल्या. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उप- (पान ४ वर)

## प्रलंबित मागण्यासाठी वीज कामगारांचे राज्यभर आंदोलन : कॉ.नाना पाटील



**धुळे, दि.२३- महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेच्यावतीने तिन्ही वीज कंपन्यातील मुख्य कार्यालय पातळीवरील तांत्रिक व इतर कामगारांच्या प्रलंबित एकवीस मागण्यांकरीता आंदोलनाची नोटीस दिलेली आहे. याअंतर्गत चांद्यापासून बांद्यापर्यंत महाराष्ट्रभर झोन, सर्कल व विभाग कार्यालय समोर हजारो कर्मचारी अभियंते व आऊटसोर्सिंग कामगार यांनी द्वारसभा व निदर्शने केली.**

महावितरण कंपनीत कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास निश्चित करणे, कर्मचाऱ्यांचे वर्क नॉर्म्स निश्चित करणे, वसुली बाबत होत असलेली दडपशाही बंद करणे, वसुलीची जबाबदारी सर्व संबंधितावर निश्चित करून सुधारित परिपत्रक काढणे, वीज कंपन्यातील ४२ हजाराच्या वर कंत्राटी कामगारांना जेष्ठता यादीनुसार कायम करण्यात यावे, तिन्ही वीज कंपन्यातील ३२ हजार रिक्त जागा भरणे, महावितरण कंपनीची ३२९ उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने चालविण्यास देण्याची काढलेले निविदा रद्द करणे, तांत्रिक व आतांत्रिक पदांचे पदोन्नती पॅनल तातडीने घेणे, मयत कामगाराच्या वारसाचे प्रलंबित (पान ४ वर)



## धुळ्यात गुरु रविदास मोची समाज वधू वर मेळावा संपन्न

**धुळे, दि.२३- संत रविदास समाज सुधार मंडळातर्फे अखिल भारतीय गुरु रविदास मोची समाज द्वितीय वधु वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न झाला.**

देवपुरातील संत रविदास समाज मंदिर येथे संत रविदास समाज सुधार मंडळातर्फे आयोजित अखिल भारतीय गुरु रविदास मोची समाजाच्या द्वितीय वधु वर परिचय मेळाव्याचे उद्घाटन माजी नगरसेवक सिद्धार्थ जगदेव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्ष रामेश्वर (पान ४ वर)

## शिरपूरला लवकरच जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय साकारणार

**शिरपूर दि.२३ (का.प्र.)- शिरपूर वकील संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शिरपूरला जिल्हा अतिरिक्त व सत्र न्यायालय आणि वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय मंजूर करण्यात आले आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारतर्फे जिल्हा प्रधान न्यायाधीश माधुरी आनंद यांना पत्र देण्यात आले असून त्यांच्यामार्फत वकील संघटनेस सूचित करण्यात आले आहे अशी माहिती शिरपूर वकील संघटनेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.शांताराम महाजन यांनी दिली.**



शिरपूरला कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय आहे. तेथील दिवाणी, फौजदारी दावे आणि अर्ज मिळून सुमारे २८०० प्रकरणे जिल्हा न्यायालयाकडे प्रलंबित आहेत. त्यामुळे शिरपूरला जिल्हा अतिरिक्त व सत्र न्यायालय आणि वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय मंजूर करावे अशी मागणी वकील संघटनेतर्फे २०२३ मध्ये जिल्हा न्यायालयाकडे करण्यात आली होती. त्यानंतर औरंगाबाद खंडपीठाचे न्या.गंगापूरवाला, धुळे जिल्हा पालक न्यायाधीश एस.जी.मेहरे, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, न्याय विभागाचे मंत्री देवेंद्र (पान ४ वर)

## शिरपूर येथे निरंकारी मिशनच्या प्रोजेक्ट अमृतचा तिसरा टप्पा; स्वच्छ जल, स्वच्छ मन या दिशेने सार्थक पाऊल

**शिरपूर, दि.२३-शिरपूर येथे निरंकारी मिशनच्या प्रोजेक्ट अमृतचा तिसरा टप्पा स्वच्छ जल, स्वच्छ मन या दिशेने सार्थक पाऊल टाकण्यात आले. अरुणावती नदी या ठिकाणी संपूर्ण बाह्य भाग साफसफाई करून हे अभियान राबविण्यात आले असून त्यामध्ये शेकडोंच्या संख्येने निरंकारी सेवा दलाचे स्वयंसेवक व अन्य भक्तगणांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.**



यावेळी शिरपूर शाखेचे मुखी गणेश पाटील, सेवादल संचालक जगदीश माळी, सेवादल शिक्षक ज्ञानेश्वर माळी, इन्चार्ज बहन पल्लवी चौधरी यांच्या सह सेवादल सदस्य व साध संगतचे सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले. सदर कचरा गोळा करण्यासाठी शिरपूर वरवाडे नगरपालिकेचे अनमोल सहकार्य लाभले. संत निरंकारी मिशनची सेवा भावना आणि मानव कल्याणाचा संकल्प साकार करण्याच्या हेतुने प्रोजेक्ट अमृत अंतर्गत स्वच्छ जल, स्वच्छ मन परियोजनेच्या तिसऱ्या टप्प्याचा शुभारंभ रविवार २३ फेब्रुवारी रोजी परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व सत्कारयोग्य निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात यमुना नदीच्या छठ घाट, आई.टी.ओ., दिल्ली येथे केला जात आहे. जल संरक्षण व स्वच्छतेच्या प्रति जागरूकता निर्माण करणे हा या परियोजनेचा उद्देश आहे, जेणेकरुन भावी पिढ्यांना निर्मळ जल आणि स्वस्थ पर्यावरणाचे वरदान प्राप्त होऊ शकेल.

संत निरंकारी मिशनने बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या प्रेरणादायक शिकवणूकींना आत्मसात करत वर्ष २०२३ मध्ये संस्कृति मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहयोगाने प्रोजेक्ट अमृतचा शुभारंभ झाला होता. या दिव्य पुढाकाराचा उद्देश केवळ जलस्रोतांची स्वच्छता सुनिश्चित करणे इतकाच नसून जल संरक्षणाला मानवी जीवनाचे अभिन्न अंग बनविण्याचा विचार विकसित करणे हा आहे. नद्या, सरोवरे, तलाव, विहिरी आणि झरे यांसारख्या प्राकृतिक जलस्रोतांची स्वच्छता व संरक्षणाला समर्पित या महाअभियानाच्या पहिल्या दोन टप्प्यांना अभूतपूर्व यश प्राप्त झाले आहे. याच प्रेरणेतून यावर्षी तृतीय टप्पा अधिक व्यापक, प्रभावी व दूरगामी दृष्टीकोनातून वाढविण्यात आला आहे ज्यायोगे हे अभियान सातत्याने विस्तारीत होऊन समाजामध्ये जागरुकता, सेवा आणि समर्पणाची एक सशक्य लाट उत्पन्न करु शकेल. संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा (पान ४ वर)

## पुण्यात आज बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद पणन मंत्री तथा अध्यक्ष जयकुमार रावल यांची माहिती



**मुंबई, दि.२३- राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी सोमवार दि.२४ फेब्रुवारी रोजी पुणे येथे बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिली. या परिषदेत राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव सहभागी होणार आहेत.**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे मार्फत आयोजित ही परिषद पुण्याच्या बाणेरमधील बंटारा भवन येथे होणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते या परिषदेचे उद्घाटन होईल. तर पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्यासह कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे आदी या परिषदेस उपस्थित राहणार असल्याची माहिती मंत्री रावल यांनी दिली. राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उप बाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षापासून सुरू आहे. राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात कालानुरूप बदल घडविणे, शेतमालाच्या विपणनामध्ये आधुनिक बाबींचा अंगीकार करणे, शेतकरी (पान ४ वर)

## मुस्लिमांना कठोर विरोध नको : आठवले

सांगली, दि.२३- मुस्लिम समाजाला कठोर विरोध करण्याच्या भूमिकेशी मी सहमत नसून, लव्ह जिहाद विरोधी कायदा बनवताना मुलीला मुस्लिम बनवण्याचा प्रयत्न करू नये अशी कायद्यात तरतूद करावी अशी आपली भूमिका असल्याचे केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी सांगलीत सांगितले. सांगलीच्या विश्रामधामवर आज मंत्री आठवले यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, मुस्लिम हे येथीलच, आपल्याच देशातील आहेत. ते काही पाकिस्तानातून आलेले नाहीत. मुलगा आणि मुलगी जर लग्न करत असतील तर त्याला विरोध (पान २ वर)

## ब्राह्मणपुरीतील रस्ता रुंदीकरणाचे अर्धवट काम पूर्ण करा : मागणी


**शहादा, दि.२३ (प्रतिनिधी) - तालुक्यातील ब्राह्मणपुरी गावातून जाणारा कोळदा - खेतिया रस्ता रुंदीकरणाचे काम गेल्या तीन वर्षापासून सुरू असून संबंधित कामाचा ठेकेदार मुख्य रस्त्याला लागून गावाकडे जाणारे रस्ते खोदून काम अर्धवट सोडून पसार झाला आहे संबंधित विभागाने अर्धवट राहिले काम त्वरित पूर्ण करावे अशा मागणीचे पत्र ब्राह्मणपुरी ग्रामपंचायत प्रशासनाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना पाठवून केली आहे.**



या पत्रात म्हटले आहे की, कोळदा ते खेतिया हा रस्ता ब्राह्मणपुरी गावातून जात असून गावअंतर्गत सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मार्फत सुमारे ३ वर्षापासून सुरू असून अद्याप देखील काम अपूर्ण आहे. मोठ्या प्रमाणावर गटारी व रस्ते खोदून ठेवले आहेत. त्याचा त्रास ग्रामस्थांना होत असल्यामुळे ग्रामस्थांच्या रोजच्या रोज तक्रारी ग्रामपंचायत प्रशासनाला प्राप्त होत आहेत. गावातून भागापूरकडे जाणारा रस्ता पूर्णपणे खोदून ठेवला असून त्यामुळे गावातील शेतकऱ्यांना शेताकडे जाणे शेतमाल घरी आणणे किंवा मार्केटपर्यंत घेऊन जाणे शक्य होत नाही तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुरू केलेले गटार बांधकाम देखील मोठ्या प्रमाणात अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे गावातील सांड पाण्याचा निचरा होत नसून ते जागोजागी साचलेले आहे त्यामुळे गावात आरोग्याच्या प्रश्न निर्माण झाला असून साथ रोग उद्भवण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. तरी रस्त्याचे काम लवकर पूर्ण करून समस्यांचे निराकरण करावे असे पत्रात म्हटले आहे. सदर पत्राच्या प्रति महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ नाशिक तसेच तहसीलदार व गट विकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -79,700 रु.+3% GST
सोने- 24 K -87,000 रु.+3% GST
चांदी- 01,0100 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

**२० वे पुण्यस्मरण**



**स्व. तुळशिराम सावळाराम गायकवाड**
(संस्थापक अध्यक्ष, संत गाडगे महाराज सांस्कृतिक मंडळ, धुळे.)
(स्वर्गवास, दि. २४/२/२००५)

काळाचा महिमा काळच जाणे.. कठीण तुमचे अचानक जाणे, आजही घुमतो स्वर तुमचा कानी, वाहतांना श्रद्धांजली डोळ्यात येते पाणी..

✻ शोकाकुल परिवार ✻
श्रीमती मंजुळाबाई तुळशिराम गायकवाड
श्रीमती हिराबाई तुळशिराम गायकवाड | प्रशांत तुळशिराम गायकवाड(मुलगा)
सौ.कविता अमोल गायकवाड(सून) | अमोल तुळशिराम गायकवाड (मुलगा)
सौ.सुप्रिया विशाल गायकवाड (सुन) | विशाल तुळशिराम गायकवाड(मुलगा)
सौ. ज्योती जनार्दन ठोंबरे(कन्या) | जनार्दन ठोंबरे (जावाई)
सौ. माधुरी आबाजी तांदळे(कन्या) | आबाजी तांदळे (जावाई)
सुभाष लोढा (मित्र),अक्षय अमोल गायकवाड,अंकुश अमोल गायकवाड(नातु)
(नातवंडे) कु. राजश्री, गायत्री, चि. सचिन, दादु, सदेश, आदेश.
कु.ज्ञानेश्वरी उर्फ आनंदी विशाल गायकवाड (नात)
चंदु टोपी व सर्व स्टॉप, धुळे.
फर्म :- गायकवाड स्टींम लॉन्ड्री, धुळे.
समस्त गायकवाड परिवार, धुळे.

# आपला महाराष्ट्र

## छावा : व्यावसायिक बाजू भक्कम करणारा चित्रपट

मराठी चित्रपट सृष्टीला महाराष्ट्रात जेव्हा सुरुवात झाली तेव्हा पासून विसावे शतक संपेपर्यंत पाटील आणि तमाशा यातच मराठी चित्रपट सृष्टी अडकली होती. कृष्णधवल आणि त्यानंतर तंत्रज्ञानात बदल झाल्याने रंगीत चित्रपट मराठीत भरपूर आले असले तरी ते तमाशा सोडायला तयार नव्हते. अधून मधून ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले चित्रपट निघत होते. थेटरमध्ये जाऊन असे चित्रपट बघणारा मोठा वर्ग होता. त्यामुळे निर्मात्यांना बऱ्यापैकी कमाई होत असे. तमाशा प्रधान चित्रपटांची तर फार मोठी यादी आहे. मात्र व्यवसायाच्या दृष्टीने बेभरवशाच्या हिंदोळ्यावर हिंदकळणाऱ्या मराठी चित्रपटाने अचानक करवट घेतले आणि रजत पटलावर श्वास हा चित्रपट झळकला. त्याने व्यवसाया बरोबरच मराठी चित्रपट सृष्टीत क्रांतिकारी बदल केले. एखाद्या नटरंग सारख्या तमाशाप्रधान चित्रपटाचा अपवाद सोडला तर बाकी सर्व चित्रपटांनी तो विषय टाकून दिला होता आणि समाजातील निरनिराळ्या विषयाला हात घातला होता. हिंदी चित्रपटात मात्र प्रत्येक दशकात चढ-उतार होत गेले. हिंदीमध्ये ही अनेक ऐतिहासिक संदर्भ असलेले चित्रपट निघाले. त्यातले काही गाजले. काही आपटले. काहींनी बऱ्यापैकी कमाई केली. काहींनी दिवाळे काढले. हिंदीतील व्यावसायिक चित्रपटांनी मात्र चांगला व्यवसाय केला. १००-१०० दिवस थिएटर मध्ये चित्रपट चालत असत. टीव्ही आल्यानंतर त्यात घट झाली. मात्र प्रेक्षक वाढत गेला. कालांतराने प्रेक्षकांची रुची बदलत गेली आणि हाणामाऱ्या, खून, रक्तरंजित कथा, उत्तान प्रदर्शनाचे चित्रपट तिकीट खिडकीवर गल्ला भरू ठरले. राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र यांच्यासारख्या कलावंतांचे चित्रपट, नंतरच्या काळात शाहरुख खान, सलमान खान, अक्षय कुमार यांच्यासारख्या अभिनेत्यांचे चित्रपट गाजले. केवळ मनोरंजनाचा भाग म्हणून त्याकडे बघितले तर ते चित्रपट बघून विसरण्यासाठीच होते. त्यातील काही गाणी प्रसिद्ध झाली. कालांतराने ती लुप्त देखील झाली. परंतु विसाव्या शतकातील शेवटच्या चार दशकातील जेवढे चित्रपट होते त्यातील गाणी आजही अजरामर आहेत. त्याबाबत मात्र आजची हिंदी चित्रपट सृष्टी नापास झाली आहे. एक वर्ग ती गाणी ऐकणारा जरूर आहे. पण त्यात काही रुची नाही, अर्थ नाही, संगीत नाही. धांगडधिंगा मात्र आहे. अलिकडच्या काळात अशा चित्रपटांचा प्रेक्षकांना कंटाळा आलेला दिसतो. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या ते आपटले. एखादा अपवाद सोडला तर बहुतेक चित्रपट तिकीट खिडकीवर प्लॉप ठरले. काही निर्मात्यांनी आणि दिग्दर्शकांनी अशावेळी ऐतिहासिक तथ्यांवर आधारित परंतु वादग्रस्त होतील असे चित्रपट काढले. त्यांनी देखील कमाई केली. सर्वसाधारणपणे जे चित्रपट व्यावसायिक म्हणून निघतात त्या चित्रपटातील एक सूरीपणा, त्याच त्या संकल्पना यामुळे प्रेक्षकांनी जवळजवळ चित्रपटांकडे पाठच फिरवली होती. या पार्श्वभूमीवर हिंदी भाषे-तून निघालेला छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छावा हा चित्रपट मोठ्या प्रमाणावर गाजत आहे. मस्त कमाई करीत आहे. त्याचबरोबर तो वादग्रस्त देखील ठरत आहे. वादग्रस्त यासाठी की संभाजी महाराजांच्या हत्येला कारणीभूत असलेल्या अभिजनांना या चित्रपटात सफाईदारपणे वगळले असून नव्या पिढीच्या प्रेक्षकांच्या डोक्यात छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येस त्यांचे मेहुणे जबाबदार होते आणि ज्या ठिकाणी त्यांची हत्या झाली त्या ठिकाणी ते मौजूद असल्याचे दाखविण्यात आले आहे. हाच तो वादाचा विषय असून सोशल मीडियावर त्याबाबत प्रतिकूल मते व्यक्त होत आहेत. आतापर्यंतच्या इतिहासामध्ये जे शिकविण्यात आले आणि अनेक अभ्यासू इतिहासकारांनी नमूद केले त्यानुसार संभाजी महाराजांना औरंगजेबाच्या हाती सोपवून देणाऱ्यात त्यांचे मेहुणे शिर्के यांचा कुठेही उल्लेख आलेला नाही. ज्या संगमेश्वर कडे त्यांना नेण्यात आले त्या परिसरात शिर्के यांचे साम्राज्य होते. असे असले तरी त्यांनी राजांना फसवून औरंगजेबाच्या हवाली केलेले नाही. असा इतिहास आपल्या सर्वांना माहिती आहे. परंतु त्या इतिहासाचा विपर्यास करून जबाबदार असणाऱ्या अभिजनांना क्लीन चीट देण्यात आली. तोच चीड आणणारा विषय ठरला आहे.

बलदंड अभिनयाचे धनी असलेले कलावंत, तरबेज तंत्रज्ञ, भव्यदिव्य सेट्स, छत्रपती संभाजी महाराजांच्या लढाया, प्रचंड खर्च केलेल्या पैशातून उभारलेले नेपथ्य, त्यातील भव्यता यामुळे हा चित्रपट अधिक उठावदार झाला. म्हणून त्याने तेवढाच व्यवसाय देखील दिला. चित्रपट निर्माण करण्याच्या आधी पूर्ण यंत्रणेने भरपूर मेहनत घेतली. अभिनेत्यांनी खूप ताकदीने अभिनयाचे प्रदर्शन केले, तलवारबाजी, घोडेस्वारी, भालाफेक, अशा युद्ध कलेतील विषयांचे प्रशिक्षण घेतले आणि हा चित्रपट प्रदर्शित झाला. त्यातील संभाजी महाराजांची भूमिका विशाल कौशल या अभिनेत्याने केली परंतु त्याला बघण्यासाठी ही गर्दी उसळलेली नव्हती. तर तरुणांच्या मनात एकूणच संभाजी राजांच्या विषयी असलेले प्रेम, त्यांचे शूरत्व यासाठी ही गर्दी होते आहे. मुळात हा चित्रपट शिवाजी सावंत यांच्या छावा नावाच्या कादंबरीवर बेतलेला आहे. कादंबरीला ऐतिहासिक पार्श्वभूमी किंवा इतिहासातील संदर्भ घेतलेले असले तरी ती शेवटी कादंबरीच ठरते. तो इतिहास असू शकत नाही. सावंतांनी देखील विविध इतिहासाचे संदर्भ त्यात शोधले असतील. आणि त्यांच्या कल्पनेतील छावा मांडला असेल. महाराष्ट्रात अनेक नावाजलेले इतिहासकार आहेत. त्यांची पुस्तके आहेत. त्यांचे संशोधन आहे. पण आपण हे ग्रंथ नजरे खालून घालत नाही. पूर्वीपासूनच नाटक आणि सिनेमे यात मांडलेल्या कथानकालाच आपण इतिहास समजत आलेलो आहोत आणि तिथेच आपली गल्लत झालेली आहे. संभाजी महाराजांच्या संपूर्ण जीवनावर प्रकाश टाकण्यास हा चित्रपट यशस्वी झालेला नाही. कारण तीन तासाच्या चित्रपटात फार काही दाखवता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून महाराजांच्या जीवनातील अशा असंख्य रोमहर्षक घटना आहेत की त्या छावा चित्रपटात दाखविल्या नाहीत. रिचर्ड अटेनबरो यांनी गांधी चित्रपट केला. पण या चित्रपटात तीन तासात समग्र गांधी त्यांनी उभा केला. म्हणूनच तो प्रभावी ठरला आणि नव्या पिढीच्या पसंतीस उतरला. ज्यांनी गांधी वाचलाच नव्हता त्यांना तो कळाला. संभाजी महाराजांच्या पराक्रमावर बेतलेला छावा त्याबाबत तोकडा पडला आहे. अनेक प्रसंग त्यात दाखविले असले तरी त्या मागचा इतिहास त्यात नाही. तांत्रिकदृष्ट्या बघितल्यास असे लक्षात येईल की या चित्रपटात तलवारी भाले याबरोबरच गदा या शस्त्राचा वापर केलेला आहे. वास्तविक छत्रपती शिवाजी महाराजांच्या तसेच संभाजी महाराजांच्या संघर्षमय जीवनात गदा कुठेही वापरलेली वाचायला मिळालेली नाही. त्या अर्थाने एका विशिष्ट वर्गाला खुश करण्यासाठी ती वापरली असावी अशी शंका येते. त्याच विशिष्ट वर्गाचा हात महाराजांच्या हत्येला कारणीभूत असूनही तो टाळण्यात आलेला आहे. ही जाणीवपूर्वक केलेली दिशाभूल वाटते. ज्यांना इतिहास माहीत आहे त्यांच्या ते ताबडतोब लक्षात येईल. बाकी औरंगजेब बनलेला खलनायक, छत्रपती संभाजी महाराजांचा पार्ट करणारा अभिनेता, कवी कलश साकारणारा कलावंत तसेच अन्य व्यक्तिरेखांनी चित्रपट चांगला झाला आहे. एकीकडे धर्मवादी दृष्टिकोन तर दुसरीकडे धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन अशी काहीतरी सरमिसळ करून निर्मात्याने, लेखकाने, दिग्दर्शकांनी स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयतक केलेला असला तरी त्यांच्या कर्तबदारीवर प्रश्नचिन्ह उभे राहते.

संभाजी महाराजांच्या धर्मांतराच्या संदर्भात औरंगजेबाने ज्या काही अटी टाकल्या होत्या. त्यावर इतिहासात फारसे (पान ३ वर)

## दोंडाईचात हस्ती गृप ऑफ स्कूलस्तर्फे छत्रपती शिवराय जयंती निमित्त शोभायात्रा उत्साहात संपन्न

**दोंडाईचा- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती गृप ऑफ स्कूलस दोंडाईचा तर्फे हस्ती स्कूल शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्या जयंती निमित्ताने शोभायात्रा उत्साहात संपन्न झाली.**

सकाळी हस्ती स्कूल मुख्य कार्यालय काराणी ज्ञानदीप येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे पूजन, माल्यार्पण व आरती आणि ध्वजारोहण दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमावत, हस्ती शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी हस्ती स्कूल प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, जीवन सपकाळे, सदाशिव महाजन, रजिया दाऊदि, रेखा गडेकर, पूनम पाटील तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद, तसेच विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. यानंतर सजविलेल्या घोड्यावर छत्रपती शिवरायांची वेशभूषा साकारलेल्या



विद्यार्थ्याला बसविले व त्याचे औक्षण करण्यात आले. यानंतर 'हस्ती नाद ढोल ताशा पथक' आपल्या वाद्यांसह सज्ज झाले. या पथकात तब्बल ढोल व ताशांचा समावेश होता ! विशेषतः या पथकात विद्यार्थिनी व शिक्षिका सहभागी झाल्या. हस्ती ध्वज पथक, हस्ती झांज पथक, हस्ती लेझिम पथक, अशा विविध पथकांनी रॅली काढण्यात आली.कौतुकास्पद बाब म्हणजे शिवजयंती निमित्ताने सर्व सहभागी विद्यार्थिनी व शिक्षिका यांनी नऊवार साडी, नाकात नथ, डोळ्यांवर काळा गॉगल, कपाळावर भगवी चंद्रकोर, पायात कोल्हापुरी चपला व डोक्यावर केशरी भगवा फेटा अशी ऐटदार मराठमोळी वेशभुषा केली होती. असा साज शृंगार करून; अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने तालात व ठेक्यात ढोल वाजवायला सुरुवात केली. यावेळी इतक्या मोठ्या संख्येने ढोल ताशांचा निनाद व जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा जय घोषांनी परिसर दुमदुमला !

शोभायात्रेदरम्यान हस्ती नाद ढोल ताशा पथकाच्या निनादाने रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेल्या नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. तसेच बहुसंख्य नागरिकांनी हा दुर्मिळ क्षण आपल्या आठवणींचा अल्बम मोबाईलने छायाचित्रे व व्हिडीओ काढून सजविला. तसेच शोभायात्रे दरम्यान हस्तीच्या भूपेंद्र चित्ते, रुचिता राजपूत, कृष्णा पाटील, भार्गवी निकुंभे, यती अग्रवाल, प्रियांशी जाधव, वैष्णवी सोनवणे, हंसिका गुप्ता यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवन प्रसंग व चरित्रावर, आपल्या भाषणातून व पोवाडा गायनातून प्रकाशझोत टाकला. सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक गोरख वाघ यांनी केले. शोभायात्रा यशस्वी होण्यासाठी संगीत कला शिक्षक प्रविण गुरव, समन्वयक मनोज ठाकुर, सुमित चव्हाण, राहुल भामरे, निलेश धनगर, विशाल पवार, शिक्षिका पूनम धनगर, ज्योत्सका सोनार, गौतमी गिरासे तसेच शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले. यावेळी दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर परदेशी यांनी व पोलीस स्थानकातील कर्मचाऱ्यांनी रॅली बंदोबस्ताचे काम पाहिले.







## एसव्हीकेएम सीबीएसई स्कूलमध्ये छत्रपती शिवरायांची जयंती उत्साहात

**धुळे, दि.२३- श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ संचलित येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूलमध्ये छत्रपती शिवरायांची जयंती शाळेच्या प्रांगणात उत्साहात साजरी करण्यात आली.**

या कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका सुनंदा मेनन यांच्या हस्ते राजे शिवछत्रपती यांच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली. शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. इयत्ता सातवीतील साईशा साळुंखे व तेजस मुंदडा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. इयत्ता दुसरी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी राजांच्या जीवनावर आधारित गीत सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्याविष्कारातून शिव राज्याभिषेक सोहळा सादर केला. शिवाजी जयंतीनिमित्त वीर मराठा योद्धा शिवाजी महाराज यांच्या विषयी विद्यार्थ्यांच्या मनात जागृती निर्माण करण्यात आली. इयत्ता सातवीतील श्रावणी नेमाने व मैत्रेय शिंदे यांनी महान योध्याच्या जीवनाची आदर्श कहानी प्रस्तुत करत त्यांच्या लढाऊपणाची आणि पराक्रामाची महती आपल्या भाषणातून सांगितली. मुख्याध्यापिका सुनंदा मेनन, उपमुख्याध्यापिका पिंकी साहा यांच्या मार्गदर्शनाखाली रवि दामोदर, सुरेखा गुजर, सारिका पाटील, श्वेतल पाठक, दिपेंद्र गिरी, गजानन परदेशी, भाग्यश्री देशमुख, विरेंद्र सैदाणे, संकेत रुद्र, डॅनियल सिंग, संजय गलवाडे, वृषाली मांडरे या शिक्षकांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## कामगार मंत्र्यांची किमान पेन्शन वाढीसाठी सकारात्मक भूमिका : कमांडर अशोक राऊत

**नवी दिल्ली, दि. २३- देशभरातील अठ्ठ्याहत्तर लाख ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या किमान पेन्शनमध्ये वाढ, पती-पत्नीला मोफत वैद्यकीय सुविधेचा लाभ आणि उच्च पेन्शन अर्जांमधील त्रुटी दुरुस्त करण्याच्या मागण्यांवर केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी सकारात्मक भूमिका घेतली आणि त्या लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.**



ईपीएस ९५ राष्ट्रीय संघर्ष समिती, जी अनेक वर्षांपासून देशभरातील अठ्ठ्याहत्तर लाख ईपीएस पेन्शनर्सच्या निवृत्तीवेतनाच्या त्यांच्या कल्याणासाठी लढा देत आहे. सदर प्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत म्हणाले की, मागील काळात कामगार मंत्री आणि अर्थमंत्री यांच्याशी नुकत्याच झालेल्या बैठकीत हे निश्चित केले गेले होते की लवकरच पेन्शन वाढीचे काम होईल, परंतु केंद्राच्या सन २०२५-२६ बजेटमध्ये याबाबत कोणतीही घोषणा न झाल्याने देशभरातील पेन्शनर्सच्या मनात मोठा रोष, आक्रोश आहे. वरील परिस्थितीचा विचार करुन श्रम मंत्री मनसुख मांडविया यांनी फेब्रुवारी रोजी संघर्ष समितीच्या प्रतिनिधीमंडळाची बैठक ठरविली होती. परंतु समितीच्या लांब अंतरावरून येणारे प्रतिनिधी दिल्लीत पोहचू शकत नसल्यामुळे दि.२१ फेब्रुवारी २०२५ रोजी सदरची मिटींग दुपारी २.३० वाजता कामगार मंत्रालयात आयोजित करण्यात आली, ज्यात राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत, राष्ट्रीय महासचिव विरेंद्र सिंह राजावर, व राष्ट्रीय सचिव रमेश बहुगुणा सहभागी झालेत. श्रम मंत्री म्हणालेत की, कामकाजामुळे थोडा विलंब झाला आहे. परंतु आपले काम कोणत्याही परिस्थितीत होईल. वाढीव पेन्शनच्या प्रकरणांचा गांभीर्याने विचार करून व्यापक सुधारणा केल्या जातील. वारंवार आश्वासनांमुळे पेन्शनधारकांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे या संदर्भात जलद आणि ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे शिष्टमंडळाने म्हटले आहे. अशी माहिती राष्ट्रीय संघर्ष समिती चे राष्ट्रीय माध्यम प्रभारी राजीव भटनागर यांनी दिली अशी माहिती धुळे जिल्हाध्यक्ष व उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष देविसिंग जाधव यांनी दिली आहे

## शहाद्यातील आश्रमात संत गाडगेबाबा जयंती साजरी साजरा

**शहादा, दि.२३ (का.प्र.)- येथील धोबी समाज सेवा संघातर्फे संत शिरोमणी गाडगेबाबा यांची १४९ वी जयंती श्री संत गाडगेबाबा आश्रमात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

प्रारंभी संत श्री गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करुन गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला आरतीचा जयघोष करण्यात आला.महाराष्ट्र धोबी समाज मंडळाचे उपाध्यक्ष,माजी नगरसेवक लोटनराव धोबी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, संत श्रृंखलेतील संत गाडगे बाबा मेरुमणी ठरले असून समस्त मानव जातीला स्वच्छतेतून समृध्दीकडे जाण्याचा महामंत्र दिला आहे.



आपल्या साध्या सोप्या भाषेतील किर्तनातून अंधश्रध्दा, बुरसटलेल्या रूढी परंपरा ,व्यसनाधिनता वर शब्दप्रहार करुन शिक्षणाचे महत्व विषद करीत जनजागृतीचे महान कार्य केले आहे. गाडगेबाबा समाजशिक्षणाचे विद्यापीठ हो-ते.आजही त्यांचे कृतिशिल विचार समाज व्यवस्थेत प्रेरक ठरणारे आहेत. या कार्यक्रमास संत जगनाडे महाराज मंडळाचे प्रमुख पदाधिकारी, समाजसेवक यशवंत चौधरी, संतोष वाल्हे, माजी नगरसेविका सौ.योगिता वाल्हे, सचीन बच्छाव, भिक्कन काकुलदे ,कृष्णा मोरे, हिरालाल बच्छाव, पूनमचंद चव्हाण, हरीष चव्हाण ,विजय बच्छाव, राजेश ठाकरे ,धनंजय बच्छाव, गिरीष काकुलदे ,विकास रावसर ,संजीव चित्ते, संजय बच्छाव ,संजय सूर्यवंशी, राजेन्द्र जाधव ,रविंद्र जाधव, उमेश जाधव, प्रा.अनिल जगदाले, स्वप्नील शिरसाले ,दिलीप चव्हाण, गोपाल सुर्यवंशी, शंकर बच्छाव महेश चव्हाण, सोनू बच्छाव, महेश चव्हाण आदी सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येन उपस्थित होते.

## कर्करोग तपासणी

(पान ३ वरुन) डॉ.राष्ट्रपाल अहिरे, डॉ.नलिनी राठी, डॉ.ललिता पवार, डॉ.वैशाली पाटील चोपडा, डॉ. मोनिका अग्रवाल, डॉ.स्मिता पाटील, डॉ.सिमा वैद्य, डॉ.शीतल राका, इतर अनेक डॉक्टर्स, महिला व बाल कल्याण अधिकारी व कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनिल पावरा, डॉ.प्रितम माळी, सर्व कर्मचारी प्रा.आ. केंद्र रोहिणी, सोनिया भसीन, योगेश्वर माळी, अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशन टीम, एच. आर. पटेल फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थिनी स्वयंसेवक, पदाधिकारी, ग्रामस्थ महिला मोठया संख्येने उपस्थित होते.

## मुस्लिमांना कठोर विरोध नको

(पान १ वरुन) होऊ नये, पण मुलीला मुस्लिम बनवण्याचा प्रयत्न होऊ नये. पण भाईचारा मजबूत करायचा असेल तर इतकी कठोर भूमिका घेणे योग्य नाही. जर अशी लग्ने होत असतील तर त्याला लव्ह जिहाद म्हणून विरोध करू नये असे माझे मत आहे, असेही मंत्री आठवले यांनी यावेळी स्पष्ट केले.

प्रकाश में आज चालबाज





BOOKING OPENS
ज्योती सिनेमा 3D JYOTI
2K CHRISTIE
DOLBY DIGITAL





ता.१४ से रोज ४ खेल टा. १२, ३, ६, ९ वजे छावा

| तिकीट दर | गोल्ड | सिल्वर | बाल्कनी |
|---|---|---|---|
| | ८० रु. | ८० रु. | १३० रु. |

ONLINE TICKET BOOKING OPEN
book my show
9422789999/9823177599 jyoticinemadhule

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE
ता. 14 से 4 Show





CHHAAVA (U/A) 11:45am,2:45,6&9:15PM

| Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर |
|---|---|---|---|---|
| Ticket Rate | ₹180 | ₹130 | ₹112 | ₹112 |

www.facebook.com/ManoharBigCinemasIndia
Book my Show Paytm
8007232021 232021/233421

## शब्दकोडे क्रमांक.२०९५



**आडवे शब्द :** १.जरुरी असलेले ४. सिंधुदुर्ग प्रांत ७.किंमत ९.दरवळ १०.वर्ण १२.आशीर्वाद १३.निराळा १४.येणे १६. समय १७.एक शेंग भाजी १८.पराभव पत्करणे २२.इंग्रजीत-आरसा २३.दक्ष २४ गणपती २६.पोलिओचा डोस २७.कठडा २८.रेतीवर रेघोट्या ओढून भविष्य सांगण्याची विद्या ३०.खवा ३२.हात धुण्याची वडी ३५.फिरोज खान, मनिषा कोईराला, संजय दत्त यांचा १९९२ रोजी प्रदर्शित झालेला सिनेमा ३७.□िकाव ३८.धंद्यातील तेजी ४०. ऑस्ट्रेलियाचा एक माजी फलंदाज 'जस्टीन :' ४२.इंग्रजी वर्ण मालेतील अकरावे वर्ण ४३.किल्ल्याची संरक्षक भिंत ४४.दुर्ग ४५.एक मुस्लिम पवित्र यात्रा ४७.नाडी ४८.दोन गोष्टीतील समानता ४९.सदन ५०.निंदनीय ५२. शर्त ५३.माकडाचे खेळ करून पो□ची खळगी भरणारा ५४.जखमेवर लावावयाचे स्निग्ध औषध **उभे शब्द :** १.उनाड २.ओसाड ३.□ंगठ्याच्या विरुद्ध दिशेला □सलेले बोट ५.रेवती, सलमान खान □ंचा एक सिनेमा ६.दिखाऊपणा ७.एक सुवासिक फुल ८.प्रेम,मा□ ११.गोंद १४.मनास घातलेला बांध १५.मुस्लिम प्रार्थना १७.एक नशा आणणारे ,मादक द्रव्य १९.हंडा २०.मौज २१.निःस्वार्थ दिलेली देणगी २२.मेळ २३.जुगार २४.नौका,जहाज २५.□भिनेता २७.कसरत २९. तीळ ३१.ईशान्य भारतातील एक राज्य ३३.पा□लाग ३४.एकसुत्रीपणा ३६.जोम,माज ३९.कुटील डाव ४१. वर्दळ ४४.फळाच्या आतील मगज ४६.इंग्रजीत-न्या□ाधीश ४७.एखाद्याप्रमाणे हुबेहुब केलेले वर्तन ४८.सरळ स्वभावाचा ४९.कमी होण्याची क्रि□ ५०.एखाद्याच्या मागाहून त्याची केलेली बुराई ५१.मन-उलट

### शब्दकोडे क्रमांक.२०९४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | स | मा | न | ■ | क | स | म | ■ | प्र | सा | □ |
| □ | म | ■ | व | री | स | ■ | री | स | ■ | ठ | ■ |
| र | त | न | ■ | त | र | बे | ज | ■ | भा | ■ | सां |
| ■ | ल | गा | न | ■ | त | री | ■ | ना | ग | रा | ज |
| पि | ■ | रा | ■ | को | ■ | ज | मा | ना | ■ | ही | ■ |
| व | सा | ■ | र | य | त | ■ | मा | व | स | ■ | वि |
| ळा | ■ | क | ■ | ना | ■ | मे | ■ | टी | ■ | □ | मा |
| ■ | स | फ | ल | ■ | म | ण | का | ■ | नी | ■ | न |
| वा | सा | ■ | ला | ल | ■ | बे | ल | न | ■ | अं | ■ |
| त | ■ | को | ट | ■ | प | त्ती | ■ | र | ण | गा | डा |
| ■ | पा | प | ■ | मो | र | ■ | छ | वी | ■ | र | ग |
| प्ले | ■ | रा | डा | ■ | त | डा | ■ | र | ड | की | ■ |

## पान १ वरुन

### मोदींनी महाराष्ट्र धर्म पराभूत केला!

सहिष्णुतेची, उदारतेची असली तरी आज महाराष्ट्राचे सांस्कृतिक अध:पतन झाले आहे. महाराष्ट्र धर्म संकुचित झाला आहे. महाराष्ट्राची संस्कृती झाकोळली जात आहे, महाराष्ट्रावर अनेक गोष्टी लादल्या जात आहेत, त्याचा प्रतिकार कसा करायचा हा प्रत्येक मराठी माणसापुढे प्रश्न असला पाहिजे. पण, आपण तो विचारत नाही. आपण व्हॉट्सअॅप झालो आहोत. आला संदेश केला फॉरवर्ड एवढेच आमचे काम राहिलेले आहे. आपण मराठी लोक विचार करणारे, बुद्धी वापरणारे राहिलेलो नाही, अशी परखड टीका सोनवणी यांनी केली. मराठी भाषा संस्कृतपासून आलेली आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी विज्ञान भवनातील उद्घाटनाच्या कार्यक्रमात म्हणाले. या विधानाला तिथे कोणीही आक्षेप नोंदवला नाही. मराठी भाषेला तुम्हीच अभिजात भाषेचा दर्जा दिला म्हणजेच ही भाषा स्वतंत्र आहे हे मान्य केले. असे असताना तुम्ही आमची भाषा संस्कृतपासून जन्माला आली असे का सांगितले, असा प्रश्न सगळ्या मराठी जनांनी मोदींना विचारला पाहिजे. मोदींच्या विधानाने आमचा महाराष्ट्र धर्म पराभूत झाला, असे स्पष्ट मत सोनवणी यांनी व्यक्त केले.

आपण सहिष्णू आहोत असे म्हणतो, पण मराठी बांधव फणा-देखील काढणे विसरलो आहोत. परभाषिक आपल्यावर आक्रमण करत असतानाही आपण फणा काढणार नसू तर आपली गलितगात्रता कधीही संपणार नाही, असे पत्रकार श्रीपाद अपराजित म्हणाले.

कर्नाटकधर्म वा गुजरातधर्म असे म्हटले जात नाही. पण, महाराष्ट्रालाच महाराष्ट्रधर्म म्हटला जातो कारण, संतांनी सांगितलेल्या मानवतेच्या धर्माच्या सारातून महाराष्ट्रधर्माची निर्मिती झाली आहे. संत अहिंसावादी आहेत पण, क्षत्रियाचे बळ देण्याचे सामर्थ्यही त्यांच्यामध्ये आहे, असा मुद्दा डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी मांडला.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही मराठी भाषेची चळवळ होती, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक प्रभाकर ओव्हाळ यांनी केले. मराठी भाषेची परंपरा, विकास आणि सौंदर्यावर प्रा.अरुणा देशपांडे यांनी विचार मांडले. महाराष्ट्रीय माणसामध्ये राज्य करावे, नेतृत्व करावे अशी आकांक्षा शतकानुशतके होती. त्यामुळे आजही दिल्लीत एखादा मराठी नेता मोठा झाला की, हा नेता पंतप्रधान होईल का असा प्रश्न आपण विचारू लागतो. मराठी माणसामध्ये सत्ता वा राज्य करण्याची आकांक्षा आहे. मराठी माणूस अन्यायाविरोधात बंड करतो. हे सगळे कवेत घेणारी आहे ती मराठी भाषा. हे महाराष्ट्रधर्माचे तीन पैलू आहेत, असे पत्रकार श्रीराम पवार म्हणाले.

### टीम इंडियाचा दणदणीत विजय

होती. मग विराट कोहलीने वन डे कारकीर्दीतली आणखी एक सर्वोत्तम खेळी उभारून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. त्याने १११ चेंडूत १०० धावा केल्या. यामध्ये त्याने ७ चौकार मारले. विराटने श्रेयस अय्यरच्या साथीने तिसऱ्या विकेटसाठी धावांची अभेद्य भागीदारी रचली. त्याआधी त्याने शुभमन गिलच्या साथीने दुसऱ्या विकेटसाठी ६९ धावांची भागीदारी रचली. श्रेयस अय्यरने आणि शुभमन गिलने धावांची खेळी केली.तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना बाबर आझम आणि इमाम उल हक यांनी पाकिस्तानला चांगली सुरुवात करून दिली. त्यांनी पहिल्या विकेटसाठी ४१ धावांची भागीदारी केली. ही भागीदारी हार्दिक पांड्याने मोडली. त्याने बाबरला तंबुत पाठवले. त्याला २६ चेंडूत पाच चौकारांसह फक्त २३ धावा करता आल्या.

### भामट्यास पोलिसांनी केली अटक

विभागीय पोलीस अधिकारी संजय बंबाळे यांना घटनेची माहिती दिली व त्यांच्या मार्गदर्शनपर सुचनेप्रमाणे तपासाची चक्रे जलद गतीने फिरवून प्रकरणाच्या तपासाला गती देण्यात आली. अवघ्या ५ तासांत संशयीत आरीफ नुर मोहम्मद शेख (वय ३१) रा.मौलवीगंज नॅशनल स्कुल जवळ, धुळे यांस ताब्यात घेवून विचारपूस करता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली असुन त्याने चोरुन आणलेले वाहनाचा बिलाडी ते जापी रोडवर अपघात केल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या कब्जातून गुन्ह्यातील पाच लाख रुपयाची महिन्द्र पिकअप वाहन आणि २ लाख ८ हजार ८०० रुपयाचे सोयाबीन खाद्यतेलाच्या ८ लोखंडी टाक्या असा एकूण ७ लाख ८ हजार ८०० रुपयांचा माल हस्तगत करुन ते पिंपळनेर पोलीस ठाण्यात हस्तांतर करण्यात आला आहे.

### कर वसुलीसाठी आयुक्त स्वत: फिल्डवर!

असे आव्हान करण्यात आलेले आहे, शास्ती माफी होणार नसल्याने सर्वांनी मार्चच्या अगोदर सर्व थकबाकी भरणे आवश्यक आहे असेही यावेळी आयुक्त अमिता दगडे पाटील यांनी स्पष्टपणे पुनश्च अधोरेखित केले. रविवारी पारोळा रोड येथील मोठे थकबाकीदार यांच्याकडे आयुक्त यांनी स्वतः जाऊन थकीत मालमत्ताबाबत मागणी केली. यामध्ये विराज सिरॅमिक्स यांनी तत्परता दाखवून चार लाखाचा धनादेश आयुक्त यांचेकडे सुपूर्त केला. त्या ठिकाणी महानगरपालिकेने यांचे विशेष आभार व्यक्त केले. तसेच इतर थकबाकीदारांनी सुद्धा सोमवारपर्यंत थकीत मालमत्ता कर भरण्यात येईल असे सांगितले. आयुक्तांनी ज्या ठिकाणी आज भेटी दिल्या त्या ठिकाणी येत्या दोन दिवसानंतर थकीत मालमत्ता प्राप्त झाला नाही तर त्यांच्यावर जप्ती कार्यवाही केली जाणार आहे असेही यावेळेस संबंधितांना सुचित केले.

थकबाकीदार मालमत्ता कर भरत नसल्याने आयुक्त अमित पाटील या स्वतः रस्त्यावर उतरून थकबाकीदाराकडे जाऊन त्यांच्या दारापुढे ढोलताशे वाजवून त्यांना मालमत्ता कर भरण्यास सांगण्यात येत आहे तसेच जे थकबाकीदार पैसे भरत नसेल त्यांची मालमत्ता सील करण्यात येणार असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणार आहे. यावेळी त्यांच्या समवेत वसुली अधीक्षक मधुकर निकुंबे, चंद्रकांत उगले, किशोर बागुल, प्रणव शिंदे, रविकिरण पाटकरी, बापू मंगिडकर, अनिल साळुंखे आदींसह अधिकारी उपस्थित होते. पारोळा रोड येथील शीतल हॉटेल, शांतीसागर हॉटेल, पंकज हॉटेल, बालाजी ग्लास या ठिकाणी थकबाकीसाठी आयुक्त स्वतः जाऊन कर भरण्याबाबत सांगण्यात आले.

### आयशरच्या धडकेत एक ठार

वडदा गावाजवळ नंदुरबारकडून भरधाव वेगात येणाऱ्या आयसर गाडीने(क्र. एमएच ३९एडी २४१४) दोन्ही दुचाकींना धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार बाबू शामू कोकणी हे गंभीर जखमी झाल्याने जागीच ठार झाले. तसेच दुसरा दुचाकीस्वार (नाव माहीत नाही) हे जखमी झाले आहे. घटनेची माहिती मिळताच विसरवाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेंद्र साबळे, पोलिस उपनिरीक्षक किरण पाटील, पोकॉ. लिनेश पाडवी, अनिल राठोड यांनी धाव घेत जखमींना नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतू उपचारा दरम्यान बाबूराव शामू कोकणी यांचा मृत्यू झाला आहे. या अपघात प्रकरणी विसरवाडी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेंद्र साबळे, हे कॉ. नरेंद्र वळवी करीत आहेत.

### वीज कामगारांचे राज्यभर आंदोलन

प्रकरणे निकाली काढणे, नवीन निर्माण झालेल्या महानगरपालिका शाखा कार्यालय कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक निर्माण करणे, वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करणे, ईपीएफ-९५ पेन्शन लागू करणे,यंत्रचालक व तांत्रिक कर्मचारी यांचा अन्यामलीचा विषय मार्गी लावणे, तिन्ही वीज कंपन्या बदली धोरण निश्चित करणे, विद्युत व इतर सहाय्यक यांचा तीन वर्षाचा कालावधी सेवानिवृत्ती उपदान व प्रथम सामान्य आदेश-७४ करीता ग्राह्य धरणे, मेडिक्लेम पॉलिसी बाबत असलेल्या तक्रारी दूर करणे, महापारेषण कंपनीतील हॉट लाईन युनिटमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे हॉटलाइन भत्ता लागू करणे, अंतर्गत भरती करीता राखीव असलेले पदे भरणे इत्यादी मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. पुढील आंदोलन २७ फेब्रुवारीला झोन कार्यालयासमोर करण्यात येणार आहे. यानंतर प्रशासनाने चर्चा करून मान्य मागणी न झाल्यास ६ मार्चला एक दिवसाच्या संपावर ८५ हजार कर्मचारी, अभियंते, अधिकारी व आऊटसोर्सिंग कामगार जाणार आहेत. आज झालेल्या आंदोलनाचे नेतृत्व कॉम्रेड मोहन शर्मा, सी.एम.देशमुख, कृष्णा भोयर महेश जोतराव व इतर केंद्रीय पदाधिकारी यांनी केल्याची माहिती कॉम्रेड नाना पाटील यांनी दिली.

* शिरपूर : येथील आर.सी.पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निकच्या सांस्कृतिक विभागातर्फे फार्मसी कॉलेजच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या रंगमंच्यावर वार्षिक सक्हेसंमेलन उत्साहात संपन्न झाले. प्रयागराज येथे  वर्षांनंतर साजरा होत असलेल्या महाकुंभ मेळाव्याचे औचित्य साधुन या कार्यक्रमाची थीम 'महाकुंभ' अशी होती. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. रेशा पटेल यांच्या हस्ते उदघाटन झाले.

## पान १ वरुन

### साहित्य संमेलनाचा भावपूर्ण समारोप

मराठीला वैश्विक पातळीवर नेण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून यासाठी साहित्यिक, विचारवंत आणि शासनाकडून संयुक्तपणे प्रयत्न व्हायला हवेत, अशी अपेक्षा व्यक्त करून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्याच्या कारभारात मराठीचा वाढता वापर होत आहे. सर्वसामान्यांच्या व्यवहार व शिक्षणात मराठीचा वापर वाढण्याची गरज आहे. नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज यांच्या नावे मराठी अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी राज्य शासनाने दहा कोटी रुपये दिले असून लवकरच हे केंद्र कार्यान्वित होणार आहे. राज्य सरकारने राज्यातल्या ग्रंथालयांना अनुदान वाढवून दिले आहे. नवलेखकांकडून कथा, कादंबरी, कवित या सर्वच क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग केले जात आहेत. यामधून वर्तमानाचा वेध घेवून आजच्या पिढीचे प्रश्न मांडण्याचे धाडस केले जात आहे. या लेखकांच्या साहित्याची दखल घेण्याची जबाबदारी मराठी भाषिकांची आहे. मराठी साहित्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये ग्रंथ प्रदर्शनांचे आयोजन केले जावे, अशी सूचना करतानाच रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठासाठी पुरेसे मनुष्यबळ व निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही शिंदे म्हणाले.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठीतील विविध साहित्यप्रवाहांचा संगम आहे. महाराष्ट्राच्या भूमीत संतांनी भक्ती संप्रदाय निर्माण केला, तर, वीरांनी शक्ती संप्रदाय निर्माण केला. विविध लोककलांनी मराठी भाषा समृद्ध होत गेली. आता मराठी भाषेच्या अभिजातपणाचा सूर्य उगवलेला आहे, त्याचा प्रकाश सर्वत्र पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. मराठीचा वेलू गगनावरी नेण्यासाठी जे जे मराठी, ते ते जोपासण्याची भूमिका सर्वांनी घ्यावी, असे आवाहन करून शिंदे म्हणाले, मराठी संस्कृती जपण्यासाठी आपण टोकाचे आग्रही असले पाहिजे. विविध घटकांच्या एकत्रिकरणातून मराठी संस्कृती आणि समाज तयार होतो. तो टिकविण्यासोबतच वाढविला पाहिजे. दोन वर्षांनी १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. येत्या दोन वर्षात मराठीने भाषेने गरुड झेप घ्यावी, मराठी ही आई, ज्ञानेश्वर माऊली, छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, बहिणाबाई, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर अशी सर्वांचीच भाषा आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्लीत झालेले हे संमेलन दीर्घकाळ स्मरणात राहील, असे सांगून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

### जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय साकारणार

फडणवीस, पालकमंत्री गिरीश महाजन, आमदार अमरीशभाई पटेल, आमदार काशीराम पावरा यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला. वकील संघाच्या प्रयतकांमुळे उच्च न्यायालयातर्फे शिरपूर कोर्टाच्या सुविधांबाबत माहिती घेण्यात आली. त्यात कोर्टाची इमारत, निवासी सुविधा, न्यायाधीशांचे चेंबर्स, कोर्ट हॉल आदिंची पाहणी करण्यात आली. त्याबाबत समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यामुळे शिरपूरला जिल्हा अतिरिक्त व सत्र न्यायालय आणि वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय मंजूर करण्यात आले आहे अशी माहिती अ‍ॅड.शांताराम महाजन यांनी दिली. या नव्या न्यायालयांमुळे वकील, पक्षकार, साक्षीदार आणि पंच यांचा वेळ आणि प्रवास खर्चात बहुमोल बचत होणार आहे.

### वधू वर मेळावा संपन्न

चत्रे, मुन्ना जबसरे, नरेंद्र गोयेकर, मदन राजदे, कांतीलाल चौधरी, राजेश चत्रे, सुनील मानकर, बैजूलाल चत्रे, धनराज कुरील, ईश्वर धुरेकर अशोक मानकर, दीपक चत्रे, राजेंद्र परदेशी, महेश मानकर, तिलक मानके, सौ.राधा कुरील, श्रीमती कुसुम देवहंस, विलास चत्रे, अ‍ॅड.दिलीप मनीखेडकर, सुनील चत्रे, सुरेंद्र धुर्मेकर, बिरजू चत्रे, रमेश कांबळे, आनंद कुरील, रमेश धूर्मेकर यांच्या समवेत समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी  मेळाव्यात वधु वर पुस्तिका प्रकाशन करण्यात आले तसेच मेळाव्यासाठी आलेल्या तरुण तरुणी यांनी आपला परिचय करून मेळाव्याला उपस्थिती लावली.

### प्रोजेक्ट अमृतचा तिसरा टप्पा

यांनी माहिती देताना सांगितले, की हे बृहत अभियान देशभरातील २७ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९०० पेक्षा अधिक शहरांमध्ये १६०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी आयोजित करण्यात आला आहे. या महाअभियानाची ही अभूतपूर्व व्यापकता त्याला एक ऐतिहासिक स्वरूप देईल ज्यातून जल संरक्षण व स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावशाली रीतीने जनसामान्यांपर्यंत पोहचू शकेल.

### बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद

व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोई-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाय योजना आदी विषयांसंदर्भात या परिषदेमध्ये चर्चा केली जाणार आहे.

राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. कृषी पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे याचबरोबर शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयतक करण्यात येत आहेत. राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. तसेच राज्यात कृषी मालासाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करुन त्यांच्यामार्फत निर्यातवृद्धी करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून या परिषदेचे आयोजन करण्यात येत असल्याचे मंत्री श्री.रावल यांनी सांगितले.

या परिषदेमध्ये राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्न वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना आदींबाबत चर्चा अपेक्षित असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

### श्री पार्थिव शिवपूजन सोहळा


वाटप सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याच्या नियोजनार्थ आर.सी. पटेल मेन बिल्डिंग येथील मराजगोपाल भंडारी हॉलफ मध्ये काल सायंकाळी श्री नागेश्वर सेवा संस्थानचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली व अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत महिला, पुरुष, विविध संस्थांचे पदाधिकारी, भक्तगण, शिवभक्तांची बैठक झाली. शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सीईओ डॉ.उमेश शर्मा यांनी प्रास्ताविकात महाशिवरात्रीच्या पर्वावर नागेश्वर येथे संपन्न होणाऱ्या कार्यक्रमाविषयी सविस्तर विवेचन केले व सर्व उपस्थितांचे आभार मानले.

### काँग्रेस मुख्यालयात आजपासून बैठका

नेते आ.विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गट नेते आ.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष व काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, खा.प्रणिती शिंदे, कुणाल पाटील, मुझफ्फर हुसेन, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी.एम. संदीप व कुणाल चौधरी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष अ‍ॅड.गणेश पाटील यांनी दिली आहे.

### गोदावरी विद्यालयात शिवजयंती उत्साहात

म्हसावद, दि.२३ (प्रतिनिधी) - शहादा तालुक्यातील म्हसावद येथील आसाराम  बापू प्राथमिक शाळा व प.पू. सती गोदावरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिवजयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी शाळेचा पर्यवेक्षिका संगिताबेन जयस्वाल, तर प्रमुख अतिथी मुख्याध्यापक प्रकाश पाटील हे होते तसेच शिवाजी महाराजांचा प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी इयत्ता पहिली ते चौथीचा विद्यार्थीनींनी शिवाजी महाराजांचा जिवन चरित्रावर गीतनृत्य सादर केले.



धुळे- देवपुरातील एकविरा मंदिरा जवळील संत गाडगे महाराज सांस्कृतिक मंडळातर्फे संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना अमोल गायकवाड, भोला सगरे, संजय गवळी, विलास पराठे, कृष्णा शिंदे, शेखर वाघ, दिलीप आखाडे, श्याम जाधव, हेमंत जाधव, आबा वाघ, श्रावण शिरसाट, सागर कोडगीर, प्रमोद गवळी, प्रवीण शिंदे, महेंद्र सगरे, संजय निकम, कपिल पराठे, किशोर  जाधव, विजय शिरसाट, रेखाताई गवळी, कल्पना निकम, गायत्री सगरे, शोभा निकम, मनीषा सगरे, धनश्री पराठे, अलका सगरे, प्रियंका वाघ, रोहिणी सगरे, लता शिरसाठ, जयश्री गवळी, संगीता गवळी, सविता आगजाडे, वैशाली शिंदे, सुप्रिया गायकवाड, मनीषा गायकवाड यांचे सह मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उठावणा**



अत्यंत दुःख के साथ सूचित किया जाता है कि

**सौ.शकुंतलादेवी श्रीकिसन खंडेलवाल**

श्रीकिसन छगनलाल खंडेलवाल की धर्मपत्नी, सीताराम खंडेलवाल की भाभीजी, विनोद, दिनेश, मनोज, राजेश की माताजी, विशाल खंडेलवाल की ताईजी का दि.२२/२/२०२५ को स्वर्गवास हुआ, जिनका उठावना सोमवार, दि.२४/२/२०२५ को दोपहर ४ बजे होगा ।

स्थान: निजी निवास, जडाव स्मृति, ग्रीन पार्क रेल्वे स्टेशन रोड, धुलिया

-: शोकाकुल :-

श्रीकिसन खंडेलवाल  सीताराम खंडेलवाल

विनोद, दिनेश, मनोज, राजेश, विशाल


और समस्त माली परिवार

फर्म- न्यू विनोद किराणा स्टोअर्स

खंडेलवाल ब्रोकर, नाशिक

राज स्पेयर हाउस, धुलिया

**भावपूर्ण श्रद्धांजली**



**स्व.श्री.नरेंद्र (नारायण) श्रीकिसनजी अग्रवाल**

सरले जीवन, विरले दर्शन, उरल्या केवळ स्मृती

व्याकुळ नेत्र आज आपणास श्रद्धांजली अर्पिती!

--------: श्रद्धावनत् :--------

श्री.अशोक माणिकराव खोपडे

१७, बालाजी अपार्टमेंट, अग्रवाल नगर, धुळे

**मे.खोपडे ऑटोमोबाईल्स, नरडाणा**

**पाहिजेत**

होलसेल मेडीकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत

१) सेल्समन बाहेरगावी जाण्यासाठी. अनुभव असल्यास प्राधान्य.

तेजस डिस्ट्रीब्युटर्स

गल्ली नं.५, धुळे

8888096777

**फ्लॅट विकणे आहे**

वल्लभनगर येथील फ्लॅट 2 BHK (1100 sq.ft.) दुसरा मजला योग्य किंमत आल्यास विकणे आहे

-: संपर्क :-

8390415156

8624861086

**पाहिजेत**

MIDC येथे इंडस्ट्रीज मध्ये अकाऊंटंट, सुपरवाईजर व कामगार पाहिजेत.

-: संपर्क :-

९१३०३९७१३०

**फ्लॅटस विकणे आहे**

धुळे देवपूर येथील ओम साईप्रित अपार्टमेंट येथे 1BHK, 2BHK फ्लॅटस् विकणे आहे.

पत्ता- विघ्नहर्ता कॉलनी, जी.टी.पी. स्टॉपच्या पुढे, देवपूर, धुळे.

मो.नं.९८२२१९७१३०

**पाहिजेत**

औषधाच्या एजन्सीसाठी खालील जागा त्वरित भरणे आहेत.

१) कलेक्शन व एजन्सी कामासाठी - ०३ पदे

२) दुकान कामासाठी - ०४ पदे

(दुचाकी चालवता येणे आवश्यक)

वेळ सकाळी ११ ते सायं.७ पर्यंत

पी अ‍ॅण्ड जी सेल्स कॉर्पोरेशन

गल्ली नं.४, अलंकार शॉपी समोर, धुळे

02562- 282560

**पाहिजेत**

१) दुकानासाठी मुले पाहिजेत.

२) बॅटरी/इन्व्हर्टर कामासाठी अनुभवी माणूस पाहिजे

-: संपर्क :-

9823241749

8329784099

**बंगला विकणे**

अग्रवाल नगर वल्लभ नगर, डोंगरे महाराज नगर

-: संपर्क :-

डि.आर.प्रॉपर्टीज

9422289693

**रोडटच शेती विकणे**

चाळीसगाव रोडटच आणि साक्रीरोड टच हॉटेल, मॅरेज लॉन, मंगल कार्यालयासाठी उपयुक्त एक एकर आणि दोन एकर शेती विकणे आहे

-: संपर्क :-

डि.आर.प्रॉपर्टीज

9422289693

**SVKM जवळ प्लॉटस् विकणे**

एस.व्ही.के.एम. शाळेजवळ सुसज्ज वसाहतीतील प्लॉट्स विकणे आहे

-: संपर्क :-

डि.आर.प्रॉपर्टीज

9422289693

**फ्लॅट विकणे आहे**

वल्लभनगर येथील फ्लॅट 2 BHK (1100 sq.ft.) दुसरा मजला योग्य किंमत आल्यास विकणे आहे

-: संपर्क :-

8390415156

8624861086

**भाड्याने देणे आहे**

गोल बिल्डींग जवळ, भारत गॅस समोर ग.नं.२ मध्ये (10x60) जागा तळ मजला भाडेतत्वावर देणे आहे.

-: संपर्क :-

9588485587

**कार्टून पुठ्ठा**

रु.१६.००

प्रति किलो बंडल

येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.

मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे

फोन : 230540

9422296340

५७ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...

Authorised Dealer Panasonic LG Life's Good

सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

*नियम व अटी लागू

श्री महावीर इलेक्ट्रीक अ‍ॅण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोन: (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०